PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Bhaubeej
Year: 1955

Song: Chaal Majhya Payat
Lyricist: Kavi Sanjeev

चाळ माझ्या पायात
पाय माझे तालात
नाचते मी तोऱ्यात मोरावाणी
चाळ माझ्या पायात
पाय माझे तालात
नाचते मी तोऱ्यात मोरावाणी
काय तुझ्या मनात
सांग माझ्या कानात
काय तुझ्या मनात
सांग माझ्या कानात
गोड गोड गुपित
तुझ्या मनी रे
चाळ माझ्या पायात
पाय माझे तालात
नाचते मी तोऱ्यात मोरावाणी
डौल आला खांदयाला
बाक आला बांध्याला
डौल आला खांदयाला
बाक आला बांध्याला
हातांची झाली अशी नागफणी
रुसते मी मनात
हसते गालात
रुसते मी मनात
हसते गालात
झुलते मी सुरात रातराणी रे
चाळ माझ्या पायात
पाय माझे तालात
नाचते मी तोऱ्यात मोरावाणी
नाजूक ओठाखाली
नाजूक ओठाखाली
छोटीशी बाई करंगुली
नाजूक ओठाखाली
छोटीशी बाई करंगुली
लाजते मी मनात
कशी सांगू जनात
लाजते मी मनात
कशी सांगू जनात
नांदू दोघं जशी राजाराणी रे
चाळ माझ्या पायात
पाय माझे तालात
नाचते मी तोऱ्यात मोरावाणी
रुप माझं चंद्राचं
पहा लाख मोलाचं
रुप माझं चंद्राचं
पहा लाख मोलाचं
चंद्राची कोर मी तारांगणी
लुकलुकत्या ताऱ्यात डुलते तोऱ्यात
लुकलुकत्या ताऱ्यात डुलते तोऱ्यात
शोभते शुक्राची मी चांदणी रे
चाळ माझ्या पायात
पाय माझे तालात
नाचते मी तोऱ्यात मोरावाणी

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*